प्रेसनोट दिनांक – २९/०१/२०१८ खडक पो. स्टे. पुणे

**अंमली पदार्थ विक्री करणारी टोळीप्रमुख आरती मिसाळ हिच्यासह पाच महिला व चार पुरुष असे नऊजणांविरुध्द मोका**

मा. रश्मी शुक्ला पोलीस आयुक्त पुणे शहर व मा. रविंद्र कदम पोलीस सह आयुक्त पुणे यांनी पुणे शहर परिसरातील अवैध रित्या चालणा-या ब्राउन शुगर (हेरॉईन),चरस,गांजा या अमंली पदार्थ विक्री करणा-या टोळींचा समुळ नायनाट करण्यासाठी व त्यांचेविरुध्द कडक व ठोस कारवाई करण्याबाबत पोलीस अधिकारी यांना सुचना दिलेले आहेत.

दिनांक – १५/१२/२०१७ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा पुणे चे पोलीस निरीक्षक सुनिल दोरगे व त्यांचे पथकातील कर्मचारी यांनी आरोपी नामे - गोपीनाथ नवनाथ मिसाळ वय - २२ रा - इनामके मळा लोहीयानगर पुणे व हुसैन पापा शेख वय – २८ रा – जाकु क्लब सैय्यदअली चाळ रुम नं ११ सांताक्रुझ (पुर्व) मुंबई यांचे विरूदध अंमली पदार्थ बाळगल्या प्रकरणी पकडण्यात आले होते. त्यानंतर मुख्य आरोपी नाम - **१)** आरती महादेव मिसाळ ऊर्फ आरती विशाल सातपुते ऊर्फ आरती मुकेश चव्हाण वय-२७ रा-इनामके मळा,लोहियानगर,पुणे. **२)**पुजा महादेव मिसाळ ऊर्फ पुजा ज्योतिबा तांबवे वय-३२ रा. इनामके मळा, लोहियानगर,पुणे. **३)**निलोफर हयात शेख वय-२७ रा. ५१२, हरकानगर,पुणे. **४)** अजहर ऊर्फ चुहा हयात शेख वय- २४ रा.५१२, हरकानगर,पुणे. **५)**रॉकिसिंग जालिंदरसिंग कल्याणी वय- २३ रा -रामटेकडी हडपसर पुणे यांचा शोध घेवुन त्यांना दिनांक – ०७/०१/२०१८ पकडण्यात आले होते त्या सर्वांच्या ताब्यातुन एकुण **शंभर ग्रॅम ब्राऊन शुगर (हेरॉईन) व दोन किलो पन्नास ग्रॅम चरस असा सहा लाख रुपयाचा अंमली पदार्थ हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर अंमली पदार्थ ते** आयशा ऊर्फ आशाबाई पापा शेख व जुलैखाबी पापा शेख दोघी रा - मुंबई यांचेकडुन खरेदी करत होते असे उघडकीस आलेले आहे त्या दोघीही फरार झालेल्या आहेत त्यांचा शोध चालु आहे.

वरील गुन्हयातील मुख्य आरोपी नामे व टोळी प्रमुख आरती महादेव मिसाळ वय – २७ वर्षे रा. इनामके मळा, लोहियानगर, पुणे ही इतर आरोपीचे मदतीने संगणमत करुन संघटितरित्या अंमली पदार्थाची आपले ओळखीचे ग्राहकांना विशेषतः तरुण मुलांना विक्री करत होती **त्यामुळे** अनेक तरुण या व्यसनाच्या आहारी गेले होते. तिने सदर व्यवसायातुन मिळालेल्या उत्पन्नातुन अनेक ठिकाणी लाखो रुपयाचे प्लॅट व घर तसेच वाहने खरेदी केल्याची माहीती पोलीसांना प्राप्त झालेली आहे. आरोपींच्या ताब्यातुन जप्त करण्यात आलेली रोख रक्कम, सोन्याचे दागिने व वाहने त्यांनी अंमली पदार्थाचे विक्रीतुन मिळालेल्या पैशातुन खरेदी केल्याचे उघडकीस आलेले आहे. **त्यांचेकडुन ब्राऊन शुगर (हेरॉईन) व चरस या अंमली पदार्थसह एक स्वीप्ट कार, एक ॲक्टिव्हा मोपेड, रोख रक्कम, सोन्याचे दागिने असा एकुण सहा लाख एक्याऐंशी हजार रुपयाचा इतर माल हस्तगत करण्यात आलेला आहे.**

सर्व आरोपी पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे त्यांचेकडे उत्पन्नाचे काहीएक साधन नाही . आरोपी **आरती मिसाळ** हिचेविरुध्द यापुर्वी खडक व पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथे ब्राऊन शुगर (हेरॉईन) व दारु विक्रीचे चार गुन्हे, **पुजा मिसाळ** हिचेविरुध्द पिंपरी पोलीस स्टेशन पुणे येथे ब्राऊन शुगर (हेरॉईन) विक्रीचा एक गुन्हा, **अजहर ऊर्फ चुहा हयात शेख** यांचेवर खडक पोलीस स्टेशन येथे घरफोडी व मारामारीचे गुन्हे असून त्याला खडक पोलीस स्टेशन कडून सन-२०१४ साली १ वर्षा करिता तडीपार करण्यात आले होते. आरोपी नामे **निलोफर हयात शेख** ही सदर व्यवसायातुन मिळालेले पैस बेकायदेशीर सावकारी व्यवसायामध्ये गुतवंत होती त्याबाबत तिचे विरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे येथे गुन्हा दाखल आहे. **रॉकीसिंग कल्याणी हा सराईत गुन्हेगार आहे त्याचेविरुध्द वानवडी पोलीस स्टेशन पुणे येथे खुनाचा प्रयत्न व दंगा मारामारी असे दोन गुन्हे दाखल आहे. तसेच त्याचेवर वेळोवेळी योग्य प्रतिबंधक कारवाई सुदधा करण्यात आलेल्या आहेत.**

यातील सर्व आरोपी **आरती मुकेश चव्हाण ऊर्फ आरती विशाल सातपुते ऊर्फ आरती महादेव मिसाळ, रा. इनामके मळा, लोहीयानगर पुणे** हिचे नेतृत्वाखाली काम करतात. त्यांनी आत्तापर्यत केलेल्या गुन्हे पध्दतीचे अवलोकन केले असता नमुद सर्व अटक आरोपी हे, आरती मिसाळ हिने तयार केलेल्या टोळीचे सदस्य आहेत. नमुद गुन्हयातील सर्व अटक व पाहिजे आरोपी यांनी आरती मिसाळ हिचे नेतृत्वाखाली आतापावेतो संघटीतरित्या तसेच वैयक्तीकरित्या टोळीचे अवैध आर्थिक प्राप्तीसाठी व राहते व आजूबाजूचे परिसरात टोळीचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी गुंडगिरी व दहशतीचा वापर करुन, अंमली पदार्थ विक्रीचे गंभिर गुन्हे केलेले आहेत. आरोपी व पाहिजे आरोपी आयशा ऊर्फ आशाबाई पापा शेख व जुलैखाबी पापा शेख दोघी रा - मुंबई यांनी अशाप्रकारे आपली टोळी तयार करुन संघटीतरित्या गुन्हे केल्याचे आढळुन आल्याने त्यांचेविरुध्द मोका कायदा अंतर्गत कारवाई करण्याबाबतचा प्रस्ताव मा. रविंद्र सेनगावकर अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे शहर यांचेकडे सादर करण्यात आलेला होता. त्याबाबत त्यांनी महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा सन १९९९ चे कलम ३ (१) (ll), ३ (४) प्रमाणे कारवाई करण्याचे आदेश दिनांक - २५/०१/२०१८ रोजी दिलेले आहेत. त्यानुसार सर्व आरोपी विरुध्द मोका अंतर्गत कारवाई करण्यात आलेली आहे सर्व आरोपींच्या मुसक्या आवळण्यात आलेल्या आहे व अवैध व्यवसाय करणारे व्यवसाय करणा-यावर अशाप्रकार कठोर व कडक कारवाई करण्याचे संकेत पोलीसांनी दिलेले आहेत.

डॉ. बसवराज तेली पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - १ पुणे यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनेनुसार खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेन्द्र मोकाशी व श्री संभाजी शिर्के पोलीस निरीक्षक (गुन्हे) व पोलीस उप निरीक्षक आनंत व्यवहारे, संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी महेश बारवकर, महेश कांबळे, अनिकेत बाबर यांनी आरोपींना पकडले होते . सदर कारवाई मध्ये भाग घेवुन प्रस्ताव तयार केलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास शहर विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्री. किशोर नाईक हे करत आहेत.